वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- शुक्रवार दि.२४ ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३

# पोलिसाच्या जाचास कंटाळून युवतीची आत्महत्या

## तब्बल ९ महिने छळ, ४ वेळा पोलिसांकडून बलात्कार, हातावर सुसाईट नोट





दिव्य वार्ता

### पीएम रिपोर्ट बदलण्यासाठी खासदाराच्या पीएचा दोनदा फोन, पोलीस निरिक्षक तडकाफडकी निलंबित

बीड, (दिव्य न्युज):- सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या डॉक्टर तरूणीने गुरुवारी रात्री आपले जीवन संपवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या डॉक्टर तरूणीने भाऊबीजेच्या दिवशी फलटणमधील एका नामांकित हॉटेलच्या बंद खोलीत रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास आत्महत्या केली. मात्र आता या आत्महत्या प्रकरणाला धक्कादायक वळण लागलं आहे. तरूणीवर पोलिसाने अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तर या प्रकरणी महिलेच्या काकांनी आणि आतेभावाने )गंभीर आरोप केले आहेत. काकांच्या आरोपानुसार, पुतणीवर शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी दबाव आणला जात होता, ज्यामुळे ती मानसिक तणावाखाली होती. डॉक्टरने आपल्या वरिष्ठांना आणि नातेवाईकांना वारंवार सांगितले होते की, तणावामुळे माझे आयुष्य संपवावे लागेल, असे त्यांनी म्हटले आहे. तर आतेभावाने तरूणीला फोन करणारे फलटण भागातील खासदारांचे पीए होते, असा आरोप केला



आहे. त्या डॉक्टर तरूणीबाबत अनेक धक्कादायक खुलासे होत आहेत.

मयत डॉक्टर तरूणी ही दोन वर्षांपासून मेडिकल ऑफिस सर म्हणून काम करत होती, मयत डॉक्टर तरूणी मूळची बीड जिल्ह्यातली आहे. दहावीपर्यंत शिक्षण बीड शहरातल्या शाळेत घेतलं. मृत डॉक्टर तरूणीला चार सख्खी भावंडे आहेत. आई वडील शेतकरी, परिस्थिती बेताची तरी तिने जिद्दीने वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलं. जळगावच्या वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षण घेतले. चुलत्यांची फॅमिली उच्चशिक्षित असल्याने शिक्षणाचे महत्व जाणले. महाबळेश्वरमध्ये पहिली पोस्टिंग मिळाली होती, ६ महिने कंत्राटी पद्धतीने काम केलं, दीड वर्षांपूर्वी फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू झाली होती. पुढच्या आठवड्यात सुट्टी घेऊन मूळ गावी जाणार होती ही डॉक्टर तरूणी अविवाहित होती.फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणातील अनेक गुड रहस्य समोर येत आहेत. डॉक्टरच्या आतेभावाने धक्कादायक माहिती दिली आहे. दोन वर्षापासून मेडिकल ऑफिस सर पान २ वर

# वयाच्या ८० व्या वर्षात नगरसेवक पदाचे अर्धशतक

## इतिहासात नोंद व्हावी असा ५१ वर्षाचा ऐतिहासिक विजयस्तंभ

### २४ ऑक्टोंबर १९७४ रोजी पहिल्यांदा नगरसेवक ते आजतागत नगरसेवक पदाची धुरा अखंडित














### आज अनेकांनी त्यांना भेटून ५१ वर्षाच्या शुभेच्छा दिल्या, आजही चालु आहे त्याच पध्दतीने समाजसेवेचे काम

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द असलेले बीडचे वयाची ८० वी गाठणारे जेष्ठ समाजसेवक सय्यद मोईनोद्दीन हाजी सय्यद बशीरोद्दीन उर्फ मोईन मास्टर यांचा आज नगरसेवक पदाचा ५१ वर्षाचा अनमोल कारकिर्दगीचे वर्षे पूर्ण झाले. म्हणजे मोईन मास्टर यांनी आज आपल्या नगरसेवक पदाची

#### वयाच्या ८० व्या वर्षाच्या आसपास आज पुर्ण केले राजकारणाचे अर्धशतक

हाफ सेन्च्युरीच पूर्ण केली. २४ ऑक्टोंबर १९७४ रोजी बीड शहरातील अजितपुरा खंदक,माळी गल्ली या वार्डमधून त्यांनी आपल्या आयुष्याची पहिली निवडणूक लढविली. त्यांचे प्रतिस्पर्धी अत्यंत ताकदवान आणि प्रतिष्ठीत असलेले स्व.रज्जाक सेठ हे होते. त्या निवडणूकीत मोईन मास्टर यांनी रज्जाक सेठ यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करून आपली नगरसेवक पदाच्या विजयाला सुरूवात केली होती. तेव्हापासून आजपर्यंत त्यांचे सामाजिक आणि राजकीय काम सतत सुरू असुन आज २४ ऑक्टोंबर २०२५ ला त्यांनी ५१ वर्षे पूर्ण करून हाफ सेन्च्युरी पूर्ण ▸▸ पान २ वर

















# जातीयवादाला बळी न पडता निवडणुकीला सामोरे जाऊ- आ.संदीप क्षीरसागर

## राष्ट्रवादीकडे आ. संदीप क्षीसागर आश्वासक चेहरा- सलीम भाई



बीड , (दिव्य न्युज):- आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक अनुषंगाने बीड व शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती गटातील कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने बोलावली होती.या बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आ. संदीप क्षीरसागर व जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी भवन बीड येथे झालेल्या बैठकीला कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. जागे अभावी निम्म्याहुन अधिक कार्यकर्ते राष्ट्रवादी भवन परिसरात उभे उभे राहून बैठकीला हजर होते होते. उपस्थित उत्साही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार संदीप क्षीरसागर यांनी आक्रमक भूमिका मांडताना म्हणाले की, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि गर्दी लक्षात घेता विरोधकांना उमेदवार मिळतील की नाही अशी माझ्या मनात शंका आहे.बीड व शिरूर तालुक्यातील सर्व त्या सर्व जिल्हा परिषद व पंचायत समिती गणात राष्ट्रवादी शरदचंद्र ▸▸ पान २ वर

# मालेगावात ३९७७ बनावट जन्म दाखले रद्द

## ८११ आरोपी, ४७ वकिलांना अटक, १२५ एजंट अन् ३५ अधिकाऱ्यांवर कारवाई

मालेगाप, (दिव्य न्युज):- भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी बनावट जन्म दाखलांचा पाठपुरावा सुरूच आहे. मालेगाव इथल्या बनावट जन्म दाखल्यांचा पाठपुरावा किरीट सोमय्या यांनी सुरूच ठेवला आहे.किरीट सोमय्या यांनी आज महापालिका अधिकारी आणि अप्पर पोलिस अधीक्षकांची चर्चा करत प्रकरणाची माहिती घेतली. मालेगावात ३ हजार ९७७ बनावट जन्म दाखले रद्द करण्यात आले असून, यात ७ गुन्ह्यांमध्ये ८११ जणांना आरोपी करण्यात आलं आहे.

मालेगाव बनावट जन्म दाखले प्रकरण हे एका मोठ्या घोटाळ्याशी संबंधित आहे, असा किरीट सोमय्या यांचा सुरूवातीपासून आरोप आहे. यात बनावट कागदपत्रांच्या आधारे



बांगलादेशी आणि रोहिंग्या लोकांना भारतीय नागरिक असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रकरणात अधिकारी आणि नागरिकांवर देखील गुन्हे दाखल झालेत.

महसूल विभागातील तहसीलदार अन् नायब तहसीलदांवर देखील निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले असून, एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट (एऊ) सारख्या केंद्रीय तपास यंत्रणांनीही छापेमारी केली आहे. असे असले तरी या प्रकरणाचा किरीट सोमय्या (घळीळीं डेरळूर) यांनी पाठपुरावा करत, आज मालेगाव महापालिकेतील अधिकारी आणि अप्पर पोलिस अधीक्षकांची भेट घेत चर्चा केली.

मालेगावमध्ये ३ हजार ९७७ बनावट जन्म दाखले रद्द करण्याचा आदेश देण्यात आले असून, त्यातील ३ हजार २७६ जन्म प्रमाणपत्र ५६ मृत्यू प्रमाणपत्र अर्जदार घेऊन गेले, तर ७०० जण जन्मदाखला तयार होऊनही घेऊनच गेलेले नाही. आतापर्यंत या प्रकरणी ७ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ८११ जणांना आरोपी करण्यात आले.

आरोपींमध्ये वकिलांचा समावेश

आरोपींमध्ये ४७ वकिलांचा समावेश असून, त्यांना अटक करण्यात आली. १२५ एजंट, ३५ सरकारी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. हे सर्व बनावट प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे. २ हजार २१४ जन्म प्रमाणपत्र महापालिकेने परत घेतले आहे, तर ९४६ लोक प्रमाणपत्र घेऊन गायब झाले.

पसारांचा शोध घ्या...

जन्म प्रमाणपत्र घेऊन पसार झालेल्यांना त्यांना फरार घोषित करावे. यंत्रणांमार्फत पसार झालेल्यांचा तपास करावा, अशी मागणी किरीट सोमय्या यांनी आज पत्रकार परिषद घेऊन केली. तपास अद्याप सुरू आहे. आरोपींची संख्या एक हजारावर पोहोचेल, असे सांगताना, मालेगावचा जन्म दाखला घोटाळा देशातील मोठा घोटाळा असल्याचेही सोमय्या यांनी म्हटले आहे.

'SIT'चा अहवाल

दरम्यान, या प्रकरणात तपास करत असलेल्या विशेष तपास पथकाने (डखढ) ऑगस्टमध्ये तपासाचा अहवाल राज्य सरकारकडे सुपूर्द केला आहे. या प्रकरणी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी २०२५ मध्ये विशेष तपास पथक स्थापन करण्यात आलं होतं. यानंतर या पथकाला एक महिन्यांची मुदत वाढ देण्यात आली होती.

पान ४ वरून

### दिवाळीत १२५ जणांनी

घुसतात. छर्रांसारखे दिसणारे तुकडे विशेषत: डोळ्यांना गंभीर इजा करतात. बऱ्याचदा मुलं कुतुहलापोटी पाईपमध्ये वाकून बघतात. नेमका त्याचवेळी स्फोट होतो. यामुळे डोळे, चेहऱ्याला गंभीर इजा होते.

भोपाळमधील रुग्णालयांमधील आकडेवारीनुसार, शेकडो रुग्णांपैकी २० ते ३० टक्के प्रकरणांमध्ये इजा गंभीर स्वरुपाची आहे. अनेकांना तातडीनं शस्त्रक्रियेची गरज भासली. काही जणांचं भुबूळ प्रत्यारोपण करावं लागलं. ज्यांना किरकोळ इजा होती, त्यांना मलमपट्टी करुन घरी पाठवण्यात आलं. पण गंभीर प्रकरणांमध्ये शस्त्रक्रिया कराव्या लागल्या.

आमच्याकडे ७ ते ३५ वर्ष वयोगटातील अनेक जण आले आहेत. यंदाच्या दिवाळीत कार्बाइड गनमुळे एका विशिष्ट प्रकारची दुखापत पाहायला मिळत असल्याची माहिती नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. अदिती दुबे यांनी दिली. 'केमिकलच्या वापरामुळे अनेकांना इजा झाली आहे. २० ते ३० टक्के लोकांची इजा गंभीर आहे. त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याशिवाय पर्याय नव्हता. किरकोळ दुखापत असलेल्यांना उपचारानंतर घरी पाठवण्यात आलं,' असं दुबे म्हणाल्या.स्थानिक स्वराज्य म्हणून काम

### पोलीसाच्या जाचास

ताकद देणे काळाची गरज आहे. त्याचबरोबर बीड नगरपालिकेचे नगराध्यक्ष पद हे अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झालेले आहे. बीड शहरामध्ये वीरशैव लिंगायत समाजाचे मतदान हे निर्णय मतदान ठरणार आहे. यामुळे बीड नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवण्यासाठी अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून वीरशैव लिंगायत समाजातील जंगम समाजाने पुढाकार घेऊन या निवडणुकीत निवडणूक लढवण्याची हिंमत आणि समाजाची ताकद दाखवणे गरजेचे आहे. या अनुषंगाने बीडमध्ये लवकरच तमाम वीरशैव लिंगायत समाजाची व्यापक बैठक आयोजित करून समाजाचे मत जाणून घेण्यात येणार आहे. बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवण्याचा निर्धार केला असल्याचे वैभव स्वामी यांनी स्पष्ट केले आहे.

### औरंगाबाद पदवीधर

समाजसेवक सय्यद नबीलुज़मा ड. यासेर पटेल ड. शेख अज़ीम यांनी आवाहन केले आहे. सोबत लागणारे कागद पत्र आधारकार्ड, इलेक्शनकार्ड, पदवी मार्कशीट किंवा डिग्री व एक पासपोर्ट फोटो घेवून यावे. फॉर्म भरुन देण्यात येईल. अशी माहिती प्रसार माध्यमांद्वारे लोकसेना संघटना प्रमुख ड प्रा इलियास इनामदार यांनी दिली आहे.

### चकलांबा पोलिसांनी

८ वाजण्याच्या सुमारास माजी पंचायत समिती सदस्य तय्यब रशीद शेख यांच्यासह जावेद रशीद शेख, जैद हनीफ सय्यद, साद हनिफ सय्यद, साहिल तय्यब शेख, हनिफ रफिक सय्यद, खाजा इस्माईल शेख, आणि इस्माईल रमजान शेख (सर्व रा. चकलांबा) या आठ जणांनी संगनमत करून जावेद सय्यद यांच्या घरासमोर येत त्यांना बाहेर बोलावले, तू रात्री पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी का गेला? असा जाब विचारत आरोपींनी अचानक काठ्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी पायावर चाकूचा वार देखील केला. याच दरम्यान भांडण सोडवण्यासाठी पुढे आलेले जावेद सय्यद यांचे वडील जब्बार सय्यद आणि पत्नी सुमय्या जावेद सय्यद यांनाही आरोपींनी मारहाण केली. या मारहाणीत तिघेही गंभीर जखमी झाले असून गावात एकच खळबळ उडाली आहे. जखमींना चकलांबा प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर जावेद सय्यद यांच्या फिर्यादीवरून चकलांबा पोलिस ठाण्यात आठ जणांविरुद्ध मारहाण, जिवे मारण्याची धमकी देणे आणि संगनमत अशा गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे चकलांबा परिसरात पुन्हा वाद उसळला तर याला जबाबदार चकलांबा पोलीस प्रशासन राहील. आठ दिवस उलटून गेले तरी चकलांबा पोलिसांनी आरोपी अजूनही अटक केलेले नाही.

पान १ वरून

### पोलीसाच्या जाचास

म्हणून काम करत होती, मागच्या वर्षभरापासून तिच्यावर राजकीय आणि पोलिसांचा मोठा दबाव होता. राजकीय नेत्यांच्या आणि पोलिसांच्या सांगण्यावरून पोस्टमार्टम रिपोर्ट तयार करायचा, रुग्णालयात घेऊन न येता त्यांना फिटनेस, अनफिटनेस सर्टिफिकेट देण्याचा दबाव होत होता. तिने टोकाचे पाऊल उचलण्याआधी जी हातावर नावे लिहिली आहेत त्यांना कठोर शिक्षा व्हावी. दोन महिन्यापूर्वीच पोलिसांना तिने पत्र देखील दिले होतं. त्यामध्ये पोलिस आणि खासदारांचे दोन पीए त्यांच्याकडून राजकीय दबाव येत होता, असं तिने म्हटलं होतं, गोपाल मदने त्याचबरोबर पोलिस निरीक्षक महाडिक यांचे देखील त्या पत्रामध्ये उल्लेख असल्याचे कुटुंबियांचा आरोप आहे..

डॉक्टर महिलेने सर्व प्रयत्न तिला न्याय मिळवण्यासाठी केले असल्याचे देखील कुटुंबियांकडून सांगण्यात येत आहे मात्र तिला न्याय मिळाला नाही याची खंत कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे. पीएच्या फोनवरून कोणत्या खासदाराने फोन करून दबाव आणला होता याचा खुलासा पोलिसांनी लवकर करावा अशी मागणी होत आहे. फलटणमध्ये राजकीय दबावामुळे आणि पोलिसांच्या दबावामुळे महिला डॉक्टरचा जीव गेल्याने संताप व्यक्त होत आहे.

पोस्टमार्टम राजकीय नेत्यांच्या म्हणण्यानुसार पाहिजे तसा रिपोर्ट बनवायचा

डॉक्टरच्या आतेभावाने एबीपी माझाशी बोलताना सांगितलं की, माझ्या बहिणीने तिचं स्वतःचं जीवन संपवलं, तीने घरी सांगितलं नाही. ती गेली दोन वर्ष मेडिकल ऑफिसर म्हणून काम करत होती. गेल्या वर्षभरापासून तिच्यावर राजकीय आणि पोलिसांचा फार मोठा दबाव होता. पोस्टमार्टम करताना त्यांच्या म्हणण्यानुसार किंवा राजकीय नेत्यांच्या म्हणण्यानुसार पाहिजे तसा पोस्टमार्टम रिपोर्ट बनवायचा किंवा बॉडी उपजिल्हा रुग्णालयात न आणता फिटनेस किंवा अनफिटनेसचे रिपोर्ट द्यायचा असा दबाव तिच्यावर होता.

पत्रात खासदाराच्या नावाचा उल्लेख

तिनं घरी न सांगता हे टोकाचे पाऊल उचललं आहे. ज्यांच्याकडून त्रास झाला त्यांची नाव तिने हातावरती लिहिलेली आहेत. आमची फक्त एवढीच अपेक्षा आहे की, आमच्या बहिणीला न्याय मिळावा. तिने याबाबत जास्त कोणाला सांगितलं नव्हतं, तिची एक दुसरी बहीण मेडिकल ऑफिसर आहे. तिला तिने राजकीय दबाव आणि पोलिसांचाही दबाव असल्याचा सांगितला होता. पोस्टमार्टमची ड्युटी लागते आणि त्यावेळी त्यांच्या म्हणण्यानुसार रिपोर्ट द्यावे लागतात, दबाव येतो ते तिने सांगितलं होतं. दोन महिन्यापूर्वी तिने या संबंधीच्या पाठपुरावा करण्यासाठी पोलीस स्टेशनला पत्र लिहिलं होतं, त्यामध्ये तिने स्पष्ट उल्लेख केला होता. खासदारांच्या दोन पीएने फोन लावले होते, त्याचबरोबर पोलीस अधीक्षक याच्यावरती आरोप केलेले आहेत, त्याचबरोबर कोणीतरी महाडिक म्हणून आहेत त्यांची नाव तिने त्या पत्रामध्ये लिहिलेले आहेत, गुन्हा दाखल करण्यासाठी तिने अर्ज दिला होता, पण गुन्हा दाखल करून घेण्यात आलेला नव्हता. त्याचबरोबर त्यावर काय कारवाई झाली त्याबाबत आजपर्यंत तिला माहिती मिळालेली नाही. तिने मागच्या महिन्यात आरटीआयला अर्ज टाकला होता, त्याचंही उत्तर तिला मिळालेलं नाही. त्या पत्रात खासदाराच्या नावाचा उल्लेख नाही मात्र खासदाराच्या पीएचा दबाव होता इतकंच सांगितला आहे, बाकी डिटेल्स मला माहिती नाहीत असंही भावाने सांगितलं आहे.

फलटण महिला डॉक्टर प्रकरणी मुख्यमंत्री फडणवीस ॲक्शन मोडवर

फलटण येथील घटनेची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सातारा एसपी यांच्याकडून घेतली असून संबंधित पोलिसाला तत्काळ निलंबित करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, डॉक्टर गेल्या काही महिन्यांपासून पोलीस आणि आरोग्य विभागातील वादात अडकल्या होत्या. वैद्यकीय तपासणीसंदर्भात पोलिसांशी झालेल्या वादानंतर त्यांच्या विरोधात अंतर्गत चौकशी सुरू होती. त्यांनी आपल्या वरिष्ठांना लेखी तक्रार देत, माझ्यावर अन्याय होत आहे; मी आत्महत्या करीन, असा इशाराही दिला होता. मात्र, त्यांच्या तक्रारीकडे वरिष्ठांकडून कोणतीही ठोस दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप सहकाऱ्यांकडून होत आहे.

सुसाईड नोटमधील गंभीर मजकूर

डॉक्टरच्या हातावर पेनाने लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये म्हटले आहे की, पोलिस निरीक्षक गोपाल बदने याने माझ्यावर चार वेळा बलात्कार केला. प्रशांत बनकर याने मला मानसिक छळ दिला.घटनेनंतर जिल्हा पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे. दरम्यान, मृत डॉक्टरच्या कुटुंबीयांनी संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. ही घटना केवळ एका डॉक्टरच्या मृत्यूपुरती मर्यादित नाही, तर आरोग्य आणि पोलीस यंत्रणेतील दबावाच्या गंभीर वास्तवावर प्रकाश टाकणारी आहे. सातारा जिल्ह्यात या प्रकरणामुळे संताप आणि दुःखाची लाट उसळली आहे.

### जातीयवादाला बळी न

पवार पक्ष साठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. मी माझ्या भूमिकेशी प्रामाणिक राहिलो याची ही पोहच पावती आहे. कार्यकर्त्यांनी विधानसभा निवडणुकीत माझ्या विजयासाठी अहोरात्र मेहनत घेतली.प्रसंगी जीवाची बाजी लावली. आता कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. मी देखील कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून साथ देणार आहे. मतदार बंधू निवडणुकीची वाट पाहत आहेत. परंतु हे सरकार निवडणुका पुढे ढकलून पळ काढण्याच्या मनस्थितीत आहे. आता कोणाची सुट्टी नाही. निश्चितपणे विरोधकांना त्यांची जागा दाखवू. सर्वांना सोबत घेऊन ही निवडणूक एकजुटीने लढू. जातीयवादाला बळी न पडता आपल्याला पुढे जायचे आहे. विरोधक मराठा- ओबीसी, हिंदू- मुस्लिम जातीयतेचे विष पेरून दिशाभूल करतील. हे सामान्य जनतेच्या लक्षात आले आहे. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कोणत्याही जातीय वादाला बळी न पडता एक दिलाने निवडणूक लढवायची आहे असे विचार आ. संदीप क्षरसागर यांनी मांडले.या बैठकीस मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सरकारच्या कार्यपद्धतीचा समाचार घेताना म्हणाले की, अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यात भयानक संकट आले होते.

अतिवृष्टीने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे शेती व पिकाचे प्रचंड नुकसान झाले.दिवाळीपूर्वी नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात पडेल व सर्वांची दिवाळी गोड होईल अशी घोषणा सरकारने केली. परंतु अद्याप शेतकऱ्यांच्या खातात पैसा पडला नाही. सरकारची घोषणा वल्गना ठरली व शेतकऱ्यांच्या नशिबी काळी दिवाळी साजरी करण्याची वेळ आली.

नुकसान भरपाई देताना सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ५७७ कोटी ची घोषणा झाली. ही मदत अत्यंत तुटपुंजी असून पर गुंठा केवळ ३५ रुपये देऊन शेतकऱ्यांची थट्टा केली.शेतकऱ्यांच्या शेतासह त्यांच्या घरात पाणी गेले. नुकसानीचा विचार न करता निकष लावून शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न सरकारने केला. ज्या शेतकऱ्यांच्या विहिरी नदीकाठी आहे अशा वाहून गेलेल्या विहिरींना अनुदान मिळणार नाही असे बोलले जाते. कोणताही शेतकरी विहीर खोदताना ज्या ठिकाणी पाणी लागेल अशा ठिकाणी विहिरी खोदतो. पाण्याची हमी म्हणून कित्येक वर्षापासून शेतकरी नदीकाठी विहीर खोदतात. याचे भान शेतकऱ्यांनी ठेवले नाही. शेतकऱ्यांविषयी त्यांच्या मनात असता राहिलेली नाही. अतिवृष्टी परिस्थितीत ही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने आपतग्रस्तांना मदतीचे काम केले आहे.

ज्या ज्या वेळीअन्याय अत्याचार होतो तेव्हा पक्षाने विरोधकाची भूमिका प्रभावीपणे मांडली. स्वर्गीय संतोष देशमुख आत्या प्रकरणात आपले आमदार संदीप क्षीरसागर यांच्या आक्रमक भूमिकेमुळे सर्व आरोपी जेलबंद झाले. त्यांना या प्रकरणात राजकीय किंमत मोजली परंतु देशमुख कुटुंबांना उघड पडू दिलं नाही न्याय हक्कासाठी जगत आहेत. असे विचार राजेंद्र मस्के यांनी यावेळी मांडले. पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार सय्यद सलीम भाई या बैठकीस मार्गदर्शन करताना म्हणाले की, विरोधक कोणता मुद्दा व कोणते धोरण घेऊन लोकांच्या समोर जाणार आहेत. गटातटाच्या राजकारणात गुंतलेले असून, राजकीय स्वार्था शिवाय त्यांना विकासाचे देणे घेणे नाही. आपल्याकडे आश्वासक चेहरा आपले लोकप्रिय आमदार संदीप क्षीरसागर आहेत. आपत्तीग्रस्त परिस्थितीत त्यांनी लोकांना केलेली मदत दिलेला आधार जनतेने अनुभवला. जनतेचा कौल अन्याया विरुद्धात आहे. यामुळेही या निवडणुका कार्यकर्त्यांसाठी सोपे आहेत कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील मतदार बांधवांची थेट संपर्क वाढवावा. असे आवाहन केले आहे. या बैठकीस ज्येष्ठ नेते डि. बी. बागल, वैजनाथ तांदळे, के. के. वडमारे, शिवराज बांगर, मदन जाधव सर, माऊली दादा, हांगे दादा,धनंजय जगताप, मिलन बापू मस्के, बाळासाहेब गोरे, खुर्शीद आलम,यांसह तालुक्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, गावागावातील जबाबदार सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बीड जिल्ह्यातील

केली असून त्यांना आज अनेकांनी भेटून शुभेच्छा देत पूर्ण सेन्च्युरी करण्याचे आशिर्वाद आणि दुवा दिली. मोईन मास्टर यांचा राजकीय संघर्ष मोठा असुन ते आज ८० वर्षाच्या आसपास आहेत. त्यांचा या ५१ वर्षाच्या राजकीय कार्यकाळात

त्यांनी समाजाच्या भल्यासाठी आणि समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी दोनदा जेलमध्ये ही गेले. एकदा त्यांना मिसा अंतर्गत कारवाई करत ११ महिने जेलमध्ये टाकण्यात आले दुसऱ्यावेळी त्यांना पुन्हा ८ महिने जेलमध्ये काढावे लागले अशा या संघर्षमय वाटचाली करणारे मोईन मास्टर यांनी आपल्या राजकीय ५१ वर्षे आपल्या ८० वर्षाच्या आसपास पुर्ण केले त्याच्या पाठीमागे मोठी कहानी आहे. आपल्य राजकीय आणि सामाजिक कार्य करतांना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मोईन मास्टर यांचे नाव मास्टर म्हणून पडले ते मिलिया शाळेत शिक्षक म्हणून नोकरीस होते. पण मनामध्ये समाजसेवा असल्याने त्यांनी नोकरी सोडून राजकारणात येवून समाजकार्याला सुरूवात केली. त्यामुळेच त्यांचे नाव मोईन मास्टर असे पडले. त्यांनी अजिजपुरा खंदक या भागातून अनेक निवडणूका लढल्या सर्व निवडणूकात त्यांनी भरपुर मतांनी विजय प्राप्त केला. बीड नगर पालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच जनतेतून नगराध्यक्ष पदाची निवडणूक झाली आणि त्या काळात स्व.अथर बाबर हे नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यावेळी मोईन मास्टर हे अथर बाबर यांचे अत्यंत विश्वासू आणि जवळचे होते. अथर बाबर यांच्या सोबत मोईन मास्टर, रूस्तम खान पठाण, खाजा मोईनोद्दीन टेलर,अनिसोद्दीन साहेब, जवाहर सारडा, डॉ.खरवडकर, बासेद मामू, मानुरकर ताई असे एक ना अनेक नामांकित व्यक्ती नगरसेवक म्हणून निवडून आले होते. मास्टर साहेब यांनी सर्वात जास्त काळ डॉ.भारतभुषण क्षीरसागर यांच्या सोबत राहिले. मास्टर साहेब हे बीड नगर पालिकेतील अनेक विषय समितीचे सभापती, स्टॅण्डींग कमिटीचे सदस्य, उपनगराध्यक्ष असे अनेक पदावत त्यांनी कामे करून समाजाला न्याय मिळवून दिला. त्यांच्या कार्यकाळात झालेल्या अनेक दर्जेदार कामांची लोक आज ही आठवण करतात. आजही एखाद्या युवकाला लाजवेल अशा पध्दतीने त्यांचे काम सुरू असुन त्याचे वय ८० वर्षोच्या आसपास असुन दवाखाना असो, पोलीस स्टेशन असो किंवा कोणतेही कार्यालय असे ते आजही पुर्वी प्रमाणेच समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी धडपड करतांना दिसुन येतात... त्यांच्या या आज ५१ व्या राजकीय आणि सामाजिक कार्याच्या वर्षाला आमची शुभेच्छा.... आज ५१ राजकीय वर्षे झाले ते पुढील १०० वर्षाचा पल्ला गाठतील अशी ताकद त्यांना अल्लाह नी द्यावी हेच त्यांच्याबद्दल आज अल्लहासमोर दुवा....!